# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# गुरुवार, दिनांक ०१ ऑगस्ट २०२४
## ठळक बातम्या

1. **अनुसूचित जाती आणि जमातींसाठी राखीव कोट्यामधे आणखी उपआरक्षण देणं चुकीचं नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा.**
2. **पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्निल कुसळेनं कोरलं ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात कांस्यपदकावर नाव.**
3. **लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शतकोत्तर चौथ्या जयंती दिनानिमित्त त्यांना सर्वत्र अभिवादन.**
4. **गोंदिया जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट; पुढील दोन दिवस सर्वत्र वादळी पर्जन्यमानाची शक्यता.**

****

उपआरक्षण

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव कोट्यामधे आणखी उपआरक्षण द्यायला हरकत नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली ७ न्यायाधीशांच्या पीठानं आज हा निर्णय दिला. अनुसूचित जाती आणि जमातींमधेही आर्थिक आणि सामाजिक स्तरांमधे प्रचंड विविधता असून त्यामुळे सर्व प्रकारच्या मागास वर्गांना एकाच गटात आरक्षण देणं योग्य नाही असं सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी निकालात म्हटलं आहे. त्याचं प्रमाण ठरवण्याचा अधिकार राज्यसरकारांना असून शिक्षण आणि नोकरीत अशा प्रकारचं आरक्षण राज्यसरकारांना देता येईल, असं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

लोकसभा

केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक २०२४ आज लोकसभेत सादर केलं. या विधेयकाअन्वये २००५ च्या आपत्ती व्यवस्थापन कायद्यात बदल करून राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांची कार्यपद्धती बळकट करण्यात येईल. दरम्यान, वायनाडमध्ये दरड कोसळून झालेली दुर्घटना ही गंभीर स्वरूपाची दुर्घटना म्हणून सरकारने घोषित करावी, अशी मागणी काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी केली. यासंदर्भात केंद्रीय

गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहिलं असल्याचं त्यांनी संसद भवनाच्या आवारात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. सरकारनं ही घोषणा केल्यानंतर खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत मदत आणि पुनर्वसनाच्या कामासाठी एक कोटी रुपये देणार असल्याचंही थरूर यांनी नमूद केलं. देशात झालेल्या रेल्वे अपघातांच्या घटनांबद्दल आत्मपरीक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. तत्पूर्वी, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रेल्वेसाठी अर्थसंकल्पात पुरेशा निधीची तरतूद केल्याबद्दल रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी त्यांचे आभार मानले आहेत. ते आज लोकसभेत चालू आर्थिक वर्षाच्या रेल्वे अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देत होते. रेल्वेच्या परिचालनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या १२ लाखांवर रेल्वे कर्मचाऱ्यांचेही त्यांनी आभार मानले.

राज्यसभा

हिंदकेसरी ठरलेल्या मल्लांना राज्य सरकारचं अनुदान गेल्या ११ वर्षांपासून मिळालेलं नाही, या मुद्द्याकडे राज्यसभेत शून्यकाळात खासदार रजनी पाटील यांनी लक्ष वेधलं. कोणताही खेळाडू असो, त्याचं वर्तमान आणि भविष्य सुरक्षित करावं, यासाठी विशेष नियामक मंडळ स्थापन करावं, अशी मागणी रजनी पाटील यांनी केली. देशात निवडणूक लढवण्यासाठी किमान वयाची अट २५ वर्षांवरून २१ वर्ष करण्याची मागणी आम आदमी पार्टीचे खासदार राघव चढ्ढा यांनी केली आहे. शून्य काळात बोलतांना चढ्ढा यांनी, तरुणांना सक्रीय राजकारणात येण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने हा बदल करावा, असं म्हटलं आहे.

लाडकी बहीण

महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचारासाठी शिवसेनेकडून राज्यभरात महिला मेळाव्यांचं आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना सचिव आणि प्रवक्त्या मनीषा कायंदे यांनी आज दिली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सन्मान यात्रेच्या माध्यमातून शिवसेना महिला आघाडी राज्यभरात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आहे. या  यात्रेची सांगता रक्षाबंधनापूर्वी होईल, असही कायंदे म्हणाल्या. सध्या या योजनेतून दररोज लाखो अर्ज सादर केले जात आहेत. मात्र जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा, यासाठी सन्मान यात्रेतील मेळाव्यांतून या योजनेची माहिती दिली जाणार आहे.

अनुसूचित जमाती आयोग

आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यात आला आहे. वैयक्तिक कुटुंबाला लाभ होईल, अशा योजना जास्तीत जास्त प्रमाणात देणे आवश्यक आहे. आपण सर्वजण जनतेचे सेवक आहोत, त्यांच्या सेवेसाठीच आपली नियुक्ती झाली आहे, याची जाणीव ठेवून आदिवासी लोकांसाठी सर्वांनी प्रामाणिकपणे काम करावं, असं आवाहन अनुसूचित जमाती आयोगाचे सदस्य जतोथु हुसेन यांनी चंद्रपूर इथं केलं. नियोजन भवन इथं आज अनुसूचित जमातीच्या योजनांचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

महसुल पंधरवडा

शासन निर्णयानुसार आजपासून महसुल पंधरवडा साजरा करण्याचं नियोजन करण्यात आलं असून त्यासाठी 1 ते 15 ऑगस्ट पर्यंत विविध सरकारी विभागांना दैनंदिन कार्यक्रम आखून देण्यात आले आहेत. या अंतर्गत आयोजित शिबिरांमध्ये सरकारी योजनांची प्रचार प्रसिध्दी करणे अंतर्भूत आहे.

पॅरिस ऑलिम्पिक

आता ऐकुया पॅरिस ऑलम्पिक मधील भारताच्या कामगिरीचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून ---

लोकमान्य टिळक पुण्यतिथी/अण्णाभाऊ साठे जयंती

थोर स्वातंत्र्यसेनानी, लेखक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या शतकोत्तर चौथ्या पुण्यतिथी निमित्त आणि मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक अण्णाभाऊ साठे यांच्या शतकोत्तर चौथ्या जयंतीनिमित्त आज त्यांना सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज राजभवनात लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. तर वर्षा या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदे यांनी लोकशाहीर साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील आज मंत्रालयात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. चेंबूरमधल्या सुमन नगर इथं लोकशाहिरांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात,'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये मोठा सहभाग राहिला', असं सांगून महाराष्ट्र सरकारच्या वतीनं मातंग समाजाच्या

सर्वांगीण विकासासाकरता आरटीची निर्मिती करण्यात आली आहे,' असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, विभागीय आयुक्त कार्यालयांसह सर्व सरकारी आस्थापना आणि अनेक संस्थांमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली, तर लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना अभिवादन करण्यात आलं. टिळक पत्रकार भवनात देखील त्यांना अभिवादन करण्यात आलं.
दरम्यान "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांचे साहित्य, शाहिरी, कामगार चळवळीतील कार्य, वाटेगाव ते मुंबई, रशिया असा झालेला प्रवास अचंबित करणारा आहे. त्यांना 'भारतरत्न' पुरस्कार देण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. अण्णाभाऊंना भारतरत्न मिळण्यासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार असून, लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा करणार आहे," असं आश्वासन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी आठवले गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी दिलं आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सारसबाग परिसरात मातंग समाज समन्वय समिती पुणे यांच्यातर्फे अभिवादन सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं, त्याप्रसंगी ते बोलत होते.

शोमिता बिस्वास

भारतीय वनसेवा अधिकारी शोमिता बिस्वास यांनी काल नागपूर इथं महाराष्ट्राच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक पदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारला. त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला प्रधान मुख्य वनसंरक्षक बनल्या आहेत. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बिस्वास यांचं स्वागत केलं. राज्याच्या मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि आता प्रधान मुख्य वनसंरक्षक महिला असणं ही अभिमानाची बाब असल्याचं मुनगंटीवार म्हणाले. बिस्वास या सध्या  पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

व्हीएनआयटी

नागपूरच्या विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात व्हीएनआयटीला  नवी दिल्ली  मधील प्रगती मैदान इथं नुकत्याच आयोजित राष्ट्रीय स्तरावरील “सरकारच्या उपलब्धी आणि योजना एक्स्पो-2024” मध्ये; तंत्रज्ञान आणि नवकल्पनांमध्ये उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रथम पारितोषिक आणि उच्च शिक्षण श्रेणीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी द्वितीय पारितोषिक प्रदान करण्यात आलं

आहे. व्हीएनआयटीतर्फे कचऱ्याच्या मूल्यवर्धनाशी संबंधित तंत्रज्ञान, बायोमास रूपांतरण, शाश्वत ऊर्जा, अभियांत्रिकीची व्हीएनआयटीद्वारे तयार करण्यात आलेली विविध उत्पादनं, प्रक्रिया आणि तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक या एक्स्पो दरम्यान दाखविण्यात आले होते.

हवामान

विदर्भाच्या गोंदिया जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून; नागपूर' भंडारा' चंद्रपूर' आणि गडचिरोली या जिल्ह्यात देखील मध्यम ते मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुढील दोन दिवस नागपूर आणि भंडारा जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता असून उर्वरित ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पर्जन्यमान राहणार आहे.

*****